# डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली,
# निम्नस्तर कृषि शिक्षण विभागांतर्गत कृषि तंत्र पदविका व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची विद्यालयस्तरीय जागेवरील विशेष प्रवेश फेरी (Spot Admission Round) राबविणेबाबतच्या सूचना

जा. क्र. डॉबासाकोकृवि/निकृशि—ई/585/२०२२ दिनांक : 08 SEP 2022

कृषि तंत्र पदविका व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम ऑफलाईन प्रवेश प्रक्रियेची रिक्त जागांकरिता **'विद्यालयस्तरीय जागेवरील विशेष प्रवेश फेरी'** (Spot Admission Round) **दिनांक २०/०९/२०२२, दिनांक २१/०९/२०२२, व दिनांक २२/०९/२०२२** या कालावधीत प्रत्येक विद्यालयात राबविण्यात येणार आहे. सदर प्रवेश प्रक्रिया खालील प्रमाणे असेल.

**<u>विद्यालयस्तरीय जागेवरील विशेष प्रवेश फेरी (Spot Admission Round)</u>**

**<u>प्रवेश प्रक्रिया</u>**

१. कृषि तंत्र पदविका व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सन २०२२—२३ च्या तीनही फेऱ्या संपल्या नंतर सदर प्रवेश प्रक्रियेत रिक्त राहीलेल्या जागा दिनांक २०/०९/२०२२, दिनांक २१/०९/२०२२, व दिनांक २२/०९/२०२२ या दिनांकास कार्यक्रम पत्रिकेनुसार भरण्यात येणार आहेत.

२. **दिनांक २०/०९/२०२२, दिनांक २१/०९/२०२२, व दिनांक २२/०९/२०२२** रोजी प्रत्येक दिवशी सकाळी १०:०० ते १:३० या वेळेत प्रवेशासाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज विहीत शुल्कासह व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित व मूळ प्रतींसह जमा करून छाननी करून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात येईल. **(वरील प्रमाणे प्रवेशासाठी उपस्थित प्रत्येक विद्यार्थ्यास संबंधित विद्यालयांतील प्राचार्यामार्फत उपस्थिती पत्रक देण्यात येईल)**

३. उपरोक्त दिनांकास महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालयात फक्त ST उमेदवारांस प्रवेश देण्यात येईल. सदर रिक्त जागा ठाणे, पालघर, रायगड, अ.नगर, नंदुरबार, धुळे, नाशिक या जिल्हयातील उमेदवारांमधून एकत्रित गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

**(टिप:— सदर अ. क्र. ३ प्रवेश प्रक्रिया सुचना फक्त महात्मा गांधी आदिवासी जनता विद्यालय, कोसबाडहिल, ता.डहाणू जि.पालघर याच विद्यालयासाठी आहे.)**

४. अनुदानित व विनाअनुदानित कृषि तंत्र विद्यालयातील राखीव प्रवर्गातील रिक्त जागा CR General अंतर्गत सरमिसळ करून **(SC/ST/VJ(A)/NT(B)/NT(C)/NT(D)/OBC/EWS)** नोंदणीकृत उपस्थित उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरल्या जातील. महिला उमेदवार उपलब्ध नसल्यास त्याऐवजी पुरूष उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

५. उपरोक्त प्रवेश प्रक्रियेनंतर जर जागा रिक्त राहिल्यास सर्वप्रथम एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २% पर्यंत विशेष मागास प्रवर्ग (SBC) उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. या पध्दतीनेही आरक्षित जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास त्या गुणवत्तेनुसार **दिनांक २२/०९/२०२२** रोजी नोंदणीकृत उमेदवारामधून CO General अंतर्गत भरण्यात येतील. तसेच खुल्या प्रवर्गातील रिक्त असलेल्या जागा गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

६. उपरोक्त प्रवेश प्रक्रियेसाठी उमेदवारांची गुणवत्ता व आरक्षण विचारात घेवून **दिनांक २०/०९/२०२२, दिनांक २१/०९/२०२२, व दिनांक २२/०९/२०२२** या प्रत्येक दिवशी विहित वेळेत प्राप्त अर्जाची छाननी करून प्रत्येक दिवशीच्या अंतिम राज्यस्तरीय गुणवत्ता यादीच्या आधारे (जिल्हाबंदी न ठेवता) उमेदवारांना प्रवेश वाटप करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादी ही त्याच दिवसा करीता मर्यादित राहील. **(प्रत्येक दिवसाकरीता प्रवेशइच्छुक विद्यार्थ्यांच्या उपस्थिती प्रमाणे गुणवत्ता यादी तयार करून त्या विद्यार्थ्यांना त्याच दिवशी आरक्षण विचारात घेवून (CR General/ Open General) गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल. CR General जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास अ.क्र.५ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.)**

७. **दिनांक २०/०९/२०२२, दिनांक २१/०९/२०२२, व दिनांक २२/०९/२०२२** रोजीची प्रवेश प्रक्रिया उपरोक्त अ.क्र. १ ते ६ येथे दर्शविल्याप्रमाणे विद्यालयस्तरावर राबविण्यात येईल. यासाठी सदर कालावधीमध्ये उमेदवारांस कृषि पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशसाठी नव्याने अर्ज सादर करता येतील.

८. ज्या विद्यार्थ्यांना नव्याने प्रवेश अर्ज सादर करावयाचे आहेत त्यांनी डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या माहिती पुस्तिका २०२२—२३ मधील सुचनांचे पालन करून विद्यापीठ संकेतस्थळावरील अर्जाची प्रिंट काढून स्वहस्ताक्षरात भरून ज्या विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे त्या कृषि तंत्र विद्यालयात विहित शुल्कासह व आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकीत व मूळ प्रतींसह **दिनांक २०/०९/२०२२, दिनांक २१/०९/२०२२, व दिनांक २२/०९/२०२२** या कालावधीत प्रत्येक दिवशी सकाळी १०:०० ते दुपारी १:३० या कालावधीत पर्यत उपस्थिती नोंदविणे आवश्यक आहे.

९. विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी कृषि तंत्र पदविका माहिती पुस्तिकेतील पृ.क्र. ५ ते ९ वर नमुद करण्यात आलेल्या विद्यालयांशी सोबत जोडण्यात आलेल्या रिक्त जागांचा तपशील पाहून प्रत्यक्ष संपर्क साधून संबंधित विद्यालयात प्रवेशासाठी उपस्थित रहावे.

१०. उपरोक्त कालावधीमध्ये प्रत्येक दिवशी स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादी ही त्या दिवसाकरीताच मर्यादित राहील.

११. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी विद्यालयांमध्ये अर्ज केले आहेत परंतू त्यांनी अंतिम प्रवेश निश्चित केलेला नाही. अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नसून उपरोक्त दिनांकास प्रवेश प्रक्रियेमध्ये संबंधित विद्यालयांत उपस्थित राहून सहभागी होवून आपला प्रवेश गुणवत्तेनुसार निश्चित करून घ्यावयाचा आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे यापूर्वीचे अर्ज काही कारणास्तव रद्द झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता करून विद्यालयात प्रवेशासाठी उपस्थित राहावे.

१२. ज्या विद्यार्थ्यांनी विहीत वेळेत उपस्थिती **(Reporting)** नोंदविलेली आहे. अशाच विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया सभागृहामध्ये प्रवेश दिला जाईल. **उपरोक्त सर्व प्रवेश प्रक्रिया संबंधित विद्यालयांतच राबविण्यात येणार आहे.**

**सहयोगी अधिष्ठाता (नि.कृ.शि)**
**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,**
**दापोली जि.रत्नागिरी.**